लोकमत

# विद्यापीठात उद्या 'ग्रंथ कृतज्ञता'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि मराठी विभागातर्फे गुरुवारी (दि. १२) सकाळी अकरा वाजता ग्रंथ कृतज्ञता समारंभ होणार आहे. ज्ञानस्रोत केंद्रातील या कार्यक्रमास ज्येष्ठ कवी डॉ. चंद्रकांत पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांचे 'पुस्तकांच्या जगात' या विषयावर व्याख्यान होणार आहे. मराठीतील ज्येष्ठ कवी सतीश काळसेकर आणि समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा अनमोल आणि बहुविध असा ग्रंथसंग्रह विद्यापीठास भेट दिला आहे. त्याबद्दल ग्रंथ कृतज्ञता समारंभ आयोजित केला आहे, अशी माहिती ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी दिली.

पुढारी

# एम.एस्सी., इतर अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन अर्जास मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रमांना प्रवेश प्रक्रियेचे ऑनलाईन अर्ज भरण्यास ३१ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यापीठ अधिविभागातील व संलग्नित महाविद्यालय येथे शिकवल्या जाणाऱ्या एम.एस्सी. अभ्यासक्रम व विद्यापीठ अधिविभागात शिकवल्या जाणा-या बी.जे., एम.जे., बी. लिब., एम.ए. इन मास कम्युनिकेशन, एम.ए. इन रशियन, एम.टेक. (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट), एमबीए, एमएसडब्लू, एमबीए (डिस्टन्स मोड), एम.ए. एम.कॉम. एलएल.एम. एम.लिब., एम.आर.एस., बी.एस्सी.-एम. एस्सी. नॅनो सायन्स इ. अभ्यासक्रम व अधिविभागातील विविध डिप्लोमा,



पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट करिता प्रवेश अर्जाची मुदत १० मेपर्यंत होती. विद्यार्थी हितास्तव अर्ज भरण्याची मुदत दि.३१ मे पर्यंत वाढविण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी http://www.unishivaji.ac.in/ mscadmission/ Admission-2022- 2023 या लिंकवरून अर्ज भरावेत. ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा आहे, त्या प्रवेश परीक्षा जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात घेण्यात येणार आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

11 MAY 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्वसमावेशक नेतृत्वावर समाजाची प्रगती अवलंबून

## अमित कुलकर्णी; शिवाजी विद्यापीठाच्या नेतृत्व विकास शिबिराचे उद्घाटन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : सर्वसमावेशक नेतृत्वावर समाजाची प्रगती अवलंबून असते. या दृष्टिकोनातून सरकारने विद्यार्थी निवडणुका निर्भय व निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी एक कायदा तयार केला आहे. त्याची अंमलबजावणी झाल्यास विद्यार्थ्यांमधून सक्षम नेतृत्व पुढे येईल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी यांनी व्यक्त केला. विद्यापीठाचा विद्यार्थी विकास कक्ष, नेतृत्व विकास केंद्र व बहाई अॅकॅडमीतर्फे पाचगणी येथे आयोजित तीन दिवसीय नेतृत्व विकास शिबिराच्या



उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कुलकर्णी म्हणाले, 'तत्कालीन राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या निवडणुकीसंदर्भात केलेला कायदा खूप महत्त्वाचा आहे. कायद्यातून पक्षविरहित निवडणुका होण्यास मदत होईल. निवडणुकांतील गैरप्रकार रोखणे यामुळे शक्य होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांमध्ये खरोखरच नेतृत्व



**कोल्हापूर : नेतृत्व विकास शिबिराचे उद्घाटन करताना अमित कुलकर्णी. शेजारी राजन सावंत, डॉ. आर. व्ही. गुरव, लेसन आझादी, डॉ. शिवाजी जाधव.**

गुण आहेत, अशा विद्यार्थ्यांना निवडणुकीत चांगली संधी असेल. विद्यार्थ्यांचे प्रश्न नेमकेपणाने मांडणे यामुळे शक्य होईल.' विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, 'विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवतो. या उपक्रमांत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा.' बहाई अॅकॅडमीचे संचालक लेसन आझादी यांनी मनोगत व्यक्त केले.

सातारा जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक अभय कुमार बन्सल, नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, नवनाथ बोंबले, डॉ. संजय ठिगळे, प्रा. कबीर खराडे, प्रशांत साठे, डॉ. ए. पी. कुलकर्णी, रुसाचे वरिष्ठ सल्लागार प्रमोद पाबरेकर, शहाजी लॉ कॉलेजचे डॉ. प्रवीण पाटील, आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाली, डॉ. जी. एस. राशीनकर, मुंबई विद्यापीठाच्या सांस्कृतिक विभागाचे समन्वयक नीलेश सावे यांनी मार्गदर्शन केले. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. पी. जी. कुंभार यांच्या उपस्थितीत शिबिराचा समारोप झाला. बहाई अॅकॅडमीचे पराग तांदळे यांनी स्वागत केले.

सकाळ




कोल्हापूर : जायंटस् ग्रुप ऑफ कोल्हापूरच्या पदग्रहण समारंभप्रसंगी बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# पर्यावरणपूरक समाज प्रबोधन करणे हेच ध्येय अवलंबावे : डॉ. शिर्के

कोल्हापूर : ''भावी पिढीचा विचार करून पर्यावरणपूरक समाज प्रबोधन करणे हेच ध्येय सेवाभावी संघटनांनी अवलंबावे,'' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. जायंटस् ग्रुप ऑफ कोल्हापूर संस्थेचा ४७ वा शपथ विधी, पदग्रहण समारंभ झाला. डॉ. शिर्के, डॉ. सतीश बापट, डॉ. अनिल माळी, मंगला कुलकर्णी, ॲड. विलासराव पोवार, रामदास रेवणकर, प्रा डॉ. महादेव शिंदे यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन केले. मावळते अध्यक्ष सुरेश घाटगे यांनी प्रास्ताविक केले. संस्थापक रवींद्र उबेरॉय, अरुण नरके यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार झाला. प्रा. शिंदे यांच्याकडून नूतन अध्यक्ष चंद्रकांत लोहार, संचालक, नवीन सभासदांना शपथ प्रदान केली, तर मानाचा हॅमर डॉ. सतीश बापट यांच्या हस्ते नूतन अध्यक्षांना सुपूर्द केला. घाटगे यांचा सपत्नीक सत्कार झाला. ग्रुपच्या वर्धापन दिनानिमित्त मान्यवरांच्या हस्ते केक कापला. कार्यवाह प्रा. पंढरीनाथ पाटील यांनी आभार मानले. ग्रुपचे सर्व माजी अध्यक्ष, सभासद, निमंत्रित उपस्थित होते. स्पेशल ऑफिसर प्रकाश क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ

# विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू



कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठातर्फे विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेशप्रक्रिया सुरू झाली असून, प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ मे करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील एम.एस्सी. व विद्यापीठाच्या अधिविभागात शिकविल्या जाणाऱ्या बी.जे., एम.जे., बी.लिब., एम.ए. इन मास कम्युनिकेशन, एम.ए. इन रशियन, एम. टेक. (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), एमबीए (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट), एमएसडब्ल्यू (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), एमबीए (डिस्टन्स मोड), एम.ए., एम.कॉम., एलएल.एम., एम.लिब., एम.आर.एस. (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट), बी.एस्सी.-एम.एस्सी. नॅनो सायन्स अभ्यासक्रम तसेच अधिविभागातील विविध डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेटकरिता प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत १० मे होती. विद्यार्थी हितास्तव ती मुदत ३१ मेपर्यंत वाढविली आहे. विद्यार्थ्यांनी http://www.unishivaji.ac.in/mscadmission/Admission-२०२२-२०२३ या लिंकवरून अर्ज भरावेत. ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा आहे, त्या प्रवेश परीक्षा जूनच्या दुसऱ्या आठवड्यात घेण्यात येणार आहेत. अद्ययावत माहितीसाठी http://www.unishivaji.ac.in/mscadmission/Admission-२०२२-२०२३ या संकेतस्थळावर भेट द्यावी, असे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

तरुण भारत



कोल्हापूर : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन करताना विद्यापीठाचे पदाधिकारी.

# कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

कोल्हापूर : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील मानव्यविद्या इमारतीसमोरील पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन केले. त्यानंतर मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रतिमा पूजन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. संभाजी शिंदे, डॉ. सचिन पन्हाळकर आदी उपस्थित होते.

तरूण भारत

# तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पौष्टिक आंबिल, चॉकलेट अन् पास्ता

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर



▪ **शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागांतर्गत अन्न तंत्रज्ञान विभागाचे संशोधन**

कन्फेक्शनरी तंत्रज्ञान, फुड प्रोसेसिंगचा वापर करून सहा महिने टिकेल असे आंबिल, चॉकलेट आणि पास्ता या पौष्टिक अन्नपदार्थांची निर्मिती संशोधनाअंती केली आहे. हे संशोधन करण्यासाठी जवळपास दोन वर्षाचा कालावधी लागला असून, येत्या सहा महिन्यात भरपूर हिमोग्लोबीन, आर्यन, प्रोटीन, कॅल्शियम, व्हिटॅमिन आदी घटक देणारे अन्नपदार्थ बाजारात येणार आहेत. यातून विद्यार्थ्यांना रोजगार मिळेलच परंतू शेतकरी, आणि उद्योजकांना आर्थिक फायदाही होईल. विज्ञान व तंत्रज्ञान दिनाचे औचित्य साधून फूड तंत्रज्ञानासंदर्भात अन्न तंत्रज्ञान विभागाचे समन्वयक डॉ. ए. के. साहू यांच्याशी 'तरुण भारत'ने संवाद साधला आहे.

तंत्रज्ञान संशोधनात जागतिक पातळीवर शिवाजी विद्यापीठ नंबर वन आहेच. परंतू या तंत्रज्ञानचा वापर पौष्टिक खाद्यपदार्थांसाठी पहिल्यांदाच केला आहे. हा प्रयोग यशस्वी झाला असून त्यातून अंबाडी भाजीयुक्त नाचणीची आंबिल, हिमोग्लोबीनयुक्त ड्रिंक, मल्टीव्हिटॅमिनयुक्त चॉकलेट, आणि तांदळापासून ग्लूटेन फ्री पास्ता तयार केला आहे. शरिरातील हिमोग्लोबीन, प्रोटीन, व्हिटॅमिन, कॅल्शियम, लोह हे घटक वाढवण्यासाठी या अन्नपदार्थांचा जेवनात सेवन करणे आवश्यक आहे. तसेच अनेक आजारांवर उपाय म्हणूनही या अन्नपदार्थांचे सेवन करण्याचा संदेश दिला आहे. आंबिल व ड्रिंक तयार करण्यासाठी अन्न संरक्षण तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. चॉकलेट आणि एनर्जी बारसाठी कन्फेक्शनरी तंत्रज्ञान, पास्ता तयार करण्यासाठी एक्स्ट्रुजन प्रक्रिया तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. संपूर्ण भारतामध्ये सुरक्षित आणि आरोग्यदायी अन्न उपलब्ध करून देणाऱ्या 'फूड सेफ्टी ॲण्ड स्टॅण्डर्ड ऑथॉरिटी ऑफ इंडियाने' सुध्दा याला मान्यता दिली आहे.

**आंबाडा भाजीयुक्त नाचणी आंबिल :** अंबाडा भाजी पौष्टिक असूनही ती आहारामध्ये कमी वापरली जाते. लहान मुलांपासून ते वृध्दांपर्यंत सर्वांना कॅल्शियमसह इतर घटक मिळावे आणि आवडीने खाल्ले जावे, म्हणून मिक्सर आणि प्रिजर तंत्रज्ञानाचा वापर करून नाचणी, आंबाडा भाजी आणि ताकयुक्त आंबिल तयार केली आहे.

**हेल्दी ड्रिंक :** गुळवेल, उंबर, पिंपळ, बेल, जास्वंदी फुल, गुळ अशी विविध औषधी गुणधर्म असलेली पान व फुलांचा वापर करून हे ड्रींक बनवले आहे. हे ड्रिंक रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे व आरोग्यदायी आहे.

**ग्लुटेन फ्री पास्ता :** गव्हात ग्लूटेन आणि प्रोटीन असल्याने सिलियाक रूग्णांना ते पचत नाही. या रूग्णांसाठी एक्स्ट्रुजन प्रक्रिया तंत्रज्ञानाचा वापर करून सोयाबिन, तांदूळ आणि कच्ची केळी वापरून ग्लुटेन फ्री पास्ता तयार केला आहे.

**मल्टीव्हिटॅमिन चॉकलेट :** द्राक्षे, साखर, ग्लुकोन सिरपचा वापर करून हे चॉकलेट तयार केले आहे. यातून अ., ब., क. पॉलिक ॲसिड तसेच खनिजे म्हणजेच मॅग्नेशिअम, क्लोराईड, झिंक ऑक्साईड, तांबे, ग्लुकोनेट आदी पदार्थ मिळतात.

**हेल्दी व एनर्जी बार :** नाचणी पोहे, खजूर, बदाम, इसबगोल, तीळ, ग्लुकोन आणि मधाचा वापर करून हेल्दी व एनर्जी बार तयार केले आहे. यातून प्रोटीन, तंतुमय पदार्थ, कॅल्शियम, लोह आणि मॅग्नेशिअम हे घटक मिळतात.



**रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त**

कोरोनामुळे प्रत्येक माणसाला रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी अन्न तंत्रज्ञान विभागाने पौष्टीक व आरोग्यदायी आहार तयार केला आहे. हे पदार्थ दररोजच्या जेवनात वापरण्यासाठी उपयुक्त आहेत.


**डॉ. ए. के. साहू (समन्वयक , अन्न तंत्रज्ञान विभाग)**

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या कृतज्ञता समारंभ

**कोल्हापूर :** बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, १२ रोजी सकाळी ११ वाजता कृतज्ञता समारंभ आयोजित केला आहे. मराठीतील ज्येष्ठ कवी सतीश काळसेकर व समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा ग्रंथसंग्रह विद्यापीठाला भेट दिला आहे. त्याबद्दल ग्रंथ कृतज्ञता समारंभ आयोजित केला आहे. ज्येष्ठ समीक्षक डॉ. चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे आहेत. त्यांचे 'पुस्तकांच्या जगात' या विषयावर व्याख्यान होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. याप्रसंगी सुप्रिया काळसेकर, कवयित्री नीरजा, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. हा कार्यक्रम बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रात होणार आहे. तरी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी केले आहे.

तरुण भारत



# पदव्युत्तर प्रवेश अर्ज भरण्यास ३१ मे पर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. ३१ मे पर्यंत अर्ज भरण्यास मुदत असल्याने जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी अर्ज भरावा, असे आवाहन केले आहे. प्रवेश अर्ज भरण्यासाठी १० मे पर्यंत अंतिम मुदत होती. विद्यार्थी हित लक्षात घेऊन ३१ मेपर्यंत अर्ज भरण्यास मुदत वाढविण्यात आली आहे, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. ज्या अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा आहे, त्या प्रवेश परीक्षा जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात घेण्यात येणार आहेत. याबाबत अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.